याचे लिंग बदलून त्यांना पुरूषांपासून चे स्त्री मध्ये बदलले आहे. याची क्रिया फक्त १५ दिवसात पूर्ण होईल. त्यांना या जगात फिरताना कळेल तरी मुलीचे आयुष्य म्हणजे काय, या जगात मुलींना कसे राहायला लागते, त्यांना किती त्रास सहन करावा लागतो. अशा प्रकारे पोलीस सर्व न्यायाधीशांसमोर सांगतात. त्या मुलीला ज्यांनी वाचविले त्या मुलांना कोर्ट निर्दोष म्हणून सोडून देतात आणि न्यायाधीश देखील या केसमध्ये स्वतःच म्हणतात की, मी माझ्या आयुष्यातील ही पहिलीच अशी केस पाहिली आहे. त्यामुळे मी योग्यच निर्णय दिला आहे. तरीही मला या पदावरून हटवण्यात आले तरी चालेल. पण हाच निर्णय योग्य राहिल."

ती मुले कशीपण असली तरी ती माणुसकी जपणारी, जाणणारी होती. त्या मुलांनी त्या निष्पाप मुलीचा जीव वाचवला. यापेक्षा त्याच्या आयुष्यात मोठी गोष्ट कोणतीच नसेल.

या जगात बरेच असेच अन्याय होतात. मुलींवर बलात्कार, अत्याचार होतात. पण यावर का कडक कायदा केला जात नाही? म्हणूनच तर गुन्हेगारी वृत्ती वाढत आहे. गुन्हेगार याच जगात मोकाट फिरत आहेत. त्यांच्यावर पण अशीच शिक्षेची कारवाई केली तर पूर्ण गुन्हेगारी वृत्ती कमी होईल व ते स्त्रीयांना आपल्या आई, बहिणीप्रमाणे वागवतील.

आपण कडक कायदा केलाच पाहिजे. नाहीतर असेच गुन्हे घडत राहतील आणि शिक्षा काय मिळणार तर दंड भरा आणि एवढी एवढी वर्षे जेलमध्ये काढा. मग तोच गुन्हा ते पुन्हा करणार नाहीत हे कशावरून? म्हणून चुकीला माफी नाही हेच खरे आहे! म्हणूनच तर कडक कायदा तयार करून कडक शिक्षा दिली पाहिजे तरच असले गुन्हे थांबतील.

***

# पास की नापस!

वर्षाचे एकूण दिवस ३६५
३५ दिवस दिवाळी आणि नाताळची सुट्टी
उरले ३३० दिवस!
५० दिवस उन्हाळ्याच्या सुट्टीत जातात
उरले २८० दिवस!
एका वर्षात एकुण ५२ रविवार असतात
उरले २२ दिवस!
विद्यार्थी ८ तास झोपता म्हणजे वर्षातून १२२ दिवस झोपतो.
उरले १०६ दिवस!
कपडे बदलणे, आघोळ, जेवण यामध्ये दररोज अडीच तास
म्हणजे ३८ दिवस, उरले ६८ दिवस!
खेळाचा रोजचा एक तास म्हणजे १५ दिवस
उरले ५३ दिवस!
फिल्म ,आजारपण, यात्र, कार्यक्रम, यासाठी २५ दिवस
उरले २८ दिवस
टिव्ही पाहणे (सिरियल) यासाठी किमान दररोज १ तास
म्हणजे १५ दिवस
उरले १३ दिवस !!
परिक्षा १२ दिवस असते
उरला १ दिवस !!!
आणि तो ही एक दिवस निकाल पाहण्यात जातो
''मग तुम्हीच सांगा विद्यार्थी नापास होणार की पास ???

**- ओंकार वि. कांबळे**
**एन.एल.सी. ३**

***

# कायदा आणि समाज



डॉ. भाग्यश्री निलकंठ कुलकर्णी
एलएल.बी. ३

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय लोकांनी भारतीयांसाठी संविधान तयार केले. संविधान संविधान हे सर्व कायद्यांचे स्त्रोत आहे. मूलभूत हक्क आणि अधिकार या संविधानाने बहाल केले आहेत. या संविधानांतर्गत राहून शासन आपला राज्यकारभार समाजासाठी सुरळीत चालवित असते.

'शहाण्याने कार्टाची पायरी चढू नये,' असे म्हटले जात असले तरी प्रत्येक व्यक्तीला जाणताअजाणता कायद्याचा परिचय होत असतो. 'मला कायदा माहीत नाही,' असे कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीमध्ये म्हणता येत नाही. कारण भारतातील प्रत्येक नागरिकाला प्रत्येक कायदा माहीत आहे, असे गृहित धरलेले असते.

विशिष्ट प्रदेशात, विशिष्ट संस्कृती असलेला बहुसंख्य लोकसंख्येचा लोकसमूह म्हणजे 'समाज' होय. भिन्न वृत्ती-प्रवृत्तीचे अनेक लोक या समाजामध्ये रहात असतात. त्यांच्यामध्ये शांतता नांदावी, सुव्यवस्था असावी म्हणून जे नियम केले जातात, त्या नियमांना 'कायदे' असे म्हणतात. कायदे-(नियम) माणसांनी माणसांसाठी बनविलेले असतात आणि त्यांचे उल्लंघन झाल्यास त्याबाबतचे अनुकूल-प्रतिकूल निर्णयही माणसेच घेत असतात.

**कायदा आणि सामाजिक सुरक्षितता :-** समाजातील विविध स्तरांतील आणि वयोगटातील लोकांच्या सुरक्षेचा प्रश्न कायद्याचा आधार घेऊन पाहिला जातो. वाहतुकीच्या नियमांतर्गत पादचाऱ्यांची आणि वाहनचालकांची सुरक्षितता, कारखान्यातील कामगारांची सुरक्षितता, अपघातग्रस्तांना नुकसानभरपाई, आयुर्विमा योजना, ग्राहक सेवा संरक्षण, औषध विक्रेता इत्यादी द्वारा समाजातील अनेक घटकांची सुरक्षितता पाहिली जाते. त्यासाठी 'औद्योगिक कायदा' (१९५१), 'किमान वेतन कायदा' (१९४८), 'कामगार नुकसानभरपाई कायदा' (१९२३) 'ग्राहक संरक्षण कायदा' (१९८६) इत्यादी अनेक कायदे समाजहितासाठी केलेले आहेत.

**कायदा आणि समाजातील दुर्बल घटक :-** समाजातील दुर्बल घटक उदा. आदिवासी समाज, बालमजूर, भटका आणि विमुक्त समाज या सर्वांचा विचार कायद्यामध्ये करून या घटकांचे कायद्याने संरक्षण केले आहे. वर्षानुवर्ष अनेक लाभापासून वंचित असणाऱ्या या घटकाला कायद्याचे कवच प्राप्त झालेले आहे.

**कायदा आणि महिला :-** समाजातील उपेक्षित वर्ग महिला वर्ग. कायद्याने स्त्रियांना अनेक हक्क आणि अधिकार मिळवून दिलेले आहेत. अलीकडेच संमत झालेला कायदा म्हणजे २००५ सालापर्यंत ज्या मुलींचा जन्म झालेला आहे त्यांना वारस हक्क आपोआप मिळणार आहे. स्त्री-पुरूष समान संधी, समान वेतन, समान पदोन्नती, समान रजा, मातृत्व रजा (मॅटर्निटी बेनेफिट ॲक्ट,१९६१) इत्यादी अनेक गोष्टी कायद्याने मिळवून दिलेल्या आहेत. सार्वजनिक ठिकाणी केली जाणारी महिलांची छेडछाड, नोकरीच्या ठिकाणी वा अन्य ठिकाणी स्त्रियांना समोरे जावे लागणाऱ्या लैंगिक छळ संदर्भातही कायद्याने महिलांना संरक्षण मिळालेले आहे.

**कायदा आणि समाजसुधारणा :-** कायदा सामाजिक बदल घडवून आणतो. समाजातील अनेक अनिष्ट रूढी, परंपरा, प्रथा दूर करण्यासाठी विविध कायदे करण्यात आलेले असून त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पूर्वीच्या काळात असणारी सतीची चाल, बालविवाह, वेठबिगारी, जातियता, अस्पृश्यता इत्यादी अनेक गोष्टी कायद्याने



CamScanner

आता कालबाह्य केलेल्या आहेत. हुंडाबंदी, अंधश्रध्दा निर्मूलन, जातिनिमूर्लन, विवाह संमत वय इत्यादीवर कायदे करून लक्ष केंद्रित केले आहे.

**कायदा आणि सामाजिक सुव्यवस्था :-** कायदा आणि समाजातील सुव्यवस्था यांचा निकटचा संबंध आहे. कायद्यामुळे समाजामध्ये सुव्यवस्था राखली जाते. वारसा हक्क, मृत्यूपत्र, विविध प्रकारचे करार उदा. व्यक्ती-व्यक्तीमधील, राज्या-राज्यामधील वा देशा-विदेशांतर्गत व्यापारी तत्वांवरील करार, विवाह विच्छेदन, पोटगी तरतूद, शैक्षणिक समान संधी इत्यादी अनेक बाबीं कायद्याच्या चौकटीत राहून केल्या तर व्यक्तींना त्यांचे अधिकार आणि हक्क सहजपणे मिळवून देतात. शैक्षणिक क्षेत्रात होणारे 'रॅगिंग' यावरही आता काद्याने नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

**कायदा आणि सामाजिक सजगता :-** कायदा आणि सामाजिक सजगता यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. 'जनहित याचिका'द्वारे (जनहित याचिका नियमावली-२०१०) सर्वसामान्य व्यक्तीलाही समाजातील क्लेशदायक गोष्टींसाठी याचिका दाखल करता येते. वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, स्त्रियांवरील अत्याचार, हुंडाबळी अशा अनेक बाबींबाबत अन्याय झालेली अथवा अन्य कोणतीही व्यक्ती नाममात्र शुल्क भरून याचिका दाखल करून न्याय मागू शकते. 'गंगा प्रदूषण' वा 'भंवरदेवी' किंवा अलीकडेच घडलेली 'निर्भया' यांच्याबाबतीत अशा प्रकारच्या याचिका दाखल केलेल्या आहेत.

**कायदा आणि सामाजिक स्थैर्य :-** कायद्यामुळे समाजामध्ये स्थैर्य लाभते. व्यक्तीला आपल्या हक्कांची आणि अधिकारांची जाणीव कायदा करून देतो. 'भाडे नियंत्रण कायदा' (१९९९), 'सायबर लॉ,' 'वाहन अपघात दावा' इत्यादी कायद्यांमुळे बेलगाम आणि गैरवर्तन करणाऱ्या व्यक्तींच्या वर्तणुकीवर नियंत्रण ठेवता येते.




**कायदा आणि सामाजिक व्यवहार :-** कायद्यामुळे समाजातील अनेक व्यवहार व्यवस्थित होतात. कायद्याद्वारे श्रम विभाजन केले जाते. कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतात. जन्म, वंश, जात, प्रदेश, वय, लिंग इत्यादी कशावरही कायदा अवलंबून नसतो किंवा कायदा या बाबींवर बदलत नाही. स्त्री-पुरूष, श्रीमंत-गरीब, सामान्य-असामान्य या सर्वांसाठी एकच कायदा असतो आणि महत्वाचे म्हणजे तो सर्वमान्य असतो.

कायद्याची आवश्यकता समाज व्यवस्था सुरळीत चालावी आणि शांतता नांदावी म्हणून असते. कायदा हा समाजातील बदलाप्रमाणे व समाजाच्या गरजेप्रमाणे बदलतो. उदा. नुकतेच बालगुन्हेगाराचे वय कमी करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे कायद्यामुळे समाज बदलतो. उदा. विशिष्ट रुढी, परंपरा-बालविवाह, स्त्री वारसा हक्क इत्यादी. अवैध कृत्य करणाऱ्यांवर किंवा कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कायदा अंकुश ठेवण्याचे काम करतो. उदा. जमावबंदी. सामाजिक आणि आर्थिक बदलामुळे जे तंत्रज्ञान विकसित झाले त्यांचा मुख्यत्वे करून दुरूपयोग केला जाऊ नये म्हणून 'माहिती आणि तंत्रज्ञान कायदा' २००० साली अस्तित्वात आला तसेच व्यक्तीलाही त्याला आवश्यक वाटणारी कोणतीही माहिती मिळविण्याचा हक्क त्याला 'माहितीचा अधिकार' (२००५) या कायद्याव्दारे मिळालेला आहे.

कायदा हा समाज सुव्यस्थेचा पाया आहे. प्रत्येक समाज व्यवस्थेमध्ये कायदा असतोच आणि या कायद्याची भीती सर्वसामान्य व्यक्तीच्या मनात असते. कोणत्याही व्यक्तीच्या मनात दहशत निर्माण करण्यासाठी कायदे अस्तित्वात आलेले नाहीत

परंतु त्यांचे उल्लंघन केल्यास त्यांचे परिणाम दर्शविण्यासाठी कायदे केले गेले. कायदयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणताही सुसंस्कृत समाज कायद्याची चौकट असल्याशिवाय प्रगती करु शकत नाही. कायद्यामुळे सर्वसामान्य व्यक्तींना आपल्या मूलभूत हक्कांची आणि अधिकारांची जाणीव झालेली आहे. अन्याय्य रुढी, परंपरा बंद करण्यासाठी आणि दुर्बलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी कायदे आवश्यक ठरतात. सार्वभौमत्व, न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता ही संविधानातील मूलतत्त्वे कायद्याशिवाय प्रत्यक्ष आणणे अशक्य आहे.

कायदा आणि समाज या नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाजासाठी कायदा आहे आणि कायद्यासाठी समाज आहे. कायद्यामुळे समाजामधील व्यापार–उदिमला स्थैर्य प्राप्त होते. अवैध कृत्ये करणारी व्यक्ती विविध करारांमुळे अज्ञानी आणि अशिक्षित समाजाचा गैरफायदा घेऊन फसवू शकत नाही. समाजविघातक कृत्यांना वेळीच आळा बसतो. समाजामध्ये पर्यायाने देशात शांतता प्रस्थापित होते. कायद्याच्या सजगतेमुळे व्यक्ती स्वत:वर होणारा अन्याय ओळखू शकते आणि कायद्याच्याच मदतीने दूर करू शकते. वित्त आणि जीवित मालमत्तेचे संरक्षण, संवर्धन करू शकते. अन्याय, अत्याचार, दडपशाही, बेबंदशाही, बेलगाम इत्यादींना न घाबरता त्यांचा योग्य त्या कायदेशीर पद्धतीने प्रतिकार करू शकते. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायद्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. कायदा हा सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रगतीला योग्य दिशा देतो. कायद्यासमोर सर्व समान असल्याने विवाद, कलह, तंटे सोडविले जातात. कोणत्याही स्तरावरील व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे आणि अधिकारांचे संरक्षण केले जाते. समाजाला स्थैर्य प्राप्त होऊन माणूस म्हणून जगण्याचा आधार कायद्यामुळे व्यक्तीला मिळतो. शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एकही निरापराध्याला शिक्षा होता कामा नये हे कायद्याचे वैशिष्ट्ये आहे. भारतीय कायद्याने बहाल केलेले मूलभूत हक्क आणि अधिकार यांची माहिती मिळवून प्रत्येकाला समाजामध्ये प्रतिष्ठाने जगता येईल हे निश्चित.

***

# तो पाऊस

निळेधार आकाश त्यातला तो पाऊस
कधी रिमझीम तर कधी झरझर ओसरणारा तो पाऊस।।
जून महिन्यातील ऋतू, शाळा सुरू होण्याचे दिवस
चिमुकल्या मुलांना आवडणारा तो पाऊस
निळेधार आकाश त्यातला तो पाऊस।।
नवीन वर्षाच्या नवीन वर्गात जाणाऱ्या त्या मुलांचा तो पाऊस
तर काहींना नावडणारा आवडणारा तो पाऊस
तर कधी नवीन वर्षाच्या जणू शुभेच्छा देणारा तो पाऊस
निळेधार आकाश त्यातला तो पाऊस।।
पुरासारखे भयानक रूप धारण करणारा तो पाऊस
तर दुष्काळाने व्याकूळ झालेल्या त्या शेतकऱ्याचा तो पाऊस
निळेधार आकाश त्यातला तो पाऊस।।
कधी काळोख कधी उजेड
पण निळेधार आकाश त्यातला तो पाऊस।।
सणासुदीला आपली हजेरी लावणारा तो पाऊस
पण ऐनवेळी गैरहजर असणारा तो पाऊस।।
असा हा रिमझिम कोसळणारा तो पाऊस।।
निळेधार आकाश त्यातला तो पाऊस।।
निळेधार आकाश त्यातला तो पाऊस।।

**– प्रणव रांपुरे**
प्री.लॉ. २

***

# माझा महाराष्ट्र

कु. श्रुतिका विश्वनाथ जाधव
एलएल.बी. २

जय जय महाराष्ट्र माझा,
हो गर्जा महाराष्ट्र माझा,
रेवा, वरदा, कृष्णा–कोयना, भद्रा–गोदावरी,
एकमताने भरती पाणी मातीच्या घागरी,
भीम थडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा ।।धृ।।


....... राजा बधे

माझा महाराष्ट्र या विषयावर लिहिताना अभिमानाच्या गोष्टींचा विचार करावासा वाटतो जो फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. या महाराष्ट्राने जगाला भक्तीमार्ग, संस्कृती, उद्योग, सहकार, शिक्षण, चित्रपटसृष्टी अशा अनेक क्षेत्रांमध्ये कामगिरी दाखविली आहे. या भारत देशातील विशाल अशा महाराष्ट्र राज्याची अस्मिता जगभर पसरली आहे. आजही महाराष्ट्र या भारत देशाची शान आहे, असे म्हणायला हरकत नाही. या महाराष्ट्रात अनेक महान व्यक्ती होऊन गेल्या. ज्यांनी महाराष्ट्र घडवला त्यांच्या नावाने आजही पूर्ण देशात महाराष्ट्र ओळखला जातो. महाराष्ट्राचे भाग्यविधाता संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, ज्यांनी शिक्षण आणि शेतकऱ्यांचे नेतृत्व केले असे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, संत गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, बालगंधर्व, दादासाहेब फाळके या सर्व महान नेत्यांची कर्मभूमी ही महाराष्ट्र होय. या सर्वांनी महाराष्ट्राची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीला प्रगतीपथावर आणून सोडले. माझ्या या महाराष्ट्रातील मानचिन्हांचा मला अभिमान आहे आणि म्हणूनच मला म्हणावेसे वाटते–

''दिव्यत्वाची जेथे प्रचिती,
तेथे कर माझे जुळती,
तेथे कर माझे जुळती.''

महाराष्ट्र हा आदमासे त्रिकोणाकृती समजला तर त्याच्या पश्चिम आणि उत्तर दिशेला उत्तुंग अशा पर्वतमाला आणि शिखरे आहेत. पश्चिमेला अरबी समुद्र तर त्याच्या तिसऱ्या बाजूला सपाटी, समुद्र किनाऱ्या लगत झुळझुळणारी दमट अशी हवा अनुभवायला मिळते तर जस जसे सह्याद्रीच्या डोंगररांगेवर जाईल तसतसे भुतासारखा येणारा वारा आपल्याला उलथून टाकतो की काय, असे वाटते. तसेच खाली पठारावर गेले तर त्या सपाट भागावर वाऱ्याविना माशागत तडफडायला होते. तसे वेगवेगळे हवामान इथे अनुभवायला मिळते. जसजसा पावसाळा चालू होतो, तसे पश्चिमेकडून वाहणारे काळे ढग सह्याद्रीच्या डोंगरावर आपटून पावसाच्या सरी यायला लागतात. महाराष्ट्रातला प्रत्येक शेतकरी मग आपल्या शेतात दंग होतो. नद्याही वहायला लागतात. पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांना उतार फार. पाऊस पडला की नद्या खूप जोराने वहायला लागतात. मग नद्या उन्हाळ्यात नव्हे, हिवाळ्यातच कोरड्या पडतात. सप्त महानद्यांमधील एक म्हणजे गोदावरी नदी. नाशिकमधील अनेक उपवने फुलवित खाली जाऊन आंध्रात ही नदी उतरते. महाराष्ट्रीयांची धर्मसंजीवनी म्हणजे भीमा नदी. सूर्यकन्या तापी नदी ही एकटीच पश्चिमेकडे जाण्याचा नियम तोडून नर्मदेचे बोट धरून पूर्वेला वाहिली. कोल्हापूर–मावळाची पंचगंगा, तिच्या काठी जगदंबा ठाण मांडून बसली आहे. विख्यातकिर्ती कृष्णा आता नदी राहिली नसून सासुरवासिनी, माहेरवासिनींची सखी झाली आहे. कोयना नदीलाही विसरून चालणार नाही. असा हा महाराष्ट्र माझा नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. त्यात आणखी भर पडली आहे ती गुहा, स्तूप, लेणी, कैलास मंदिर आदींची. आमचा ताजमहाल, अजिंठा वेरूळ लेणी पहायला तर पूर्ण जगभरातले लोक पहायला येतात.

गोविंदाग्रजांनी महाराष्ट्राला कणखर, राकट,




नाजूक, कोमल, फुलांच्या, भक्तीभावाच्या, मर्दाच्या देशा असे अनेक गुणांनी दर्शविले आहे. खरंच! महाराष्ट्राला दिलेल्या उपमा या परस्परविरोधी आहेत. पण हजारो वर्षांपूर्वीपासून अनेक लढाया लढून अनेक अनुभव घेऊन आलेल्या या महाराष्ट्राला कणखर, राकट, नाजूक, कोमल, भक्तीभावांचा देश कोणी बनविले? कोणी पैलू पाडले, जेथून महाराष्ट्र राज्यासारख्या हिऱ्याची निर्मिती झाली. या राज्यातील भक्तीसंप्रदायाचा पाया ठरले ते ज्ञानेश्वर व कळस ठरले ते तुकाराम. स्त्री शिक्षण दिले ते महात्मा फुले यांनी, शिक्षण घेत घेत स्वावलंबी बना, असा संदेश दिला कर्मवीर अण्णांनी, शुद्रादि–शूद्रांना न्याय देण्यासाठी स्वतःच्या हाडांची काडे केली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी. खरं तर महाराष्ट्रातील या सर्वच थोर महापुरूषांच्या नेतृत्वामुळे, त्यांच्या स्वभावगुणांमुळे हा महाराष्ट्र तयार झाला. त्याला त्याचा स्वभाव प्राप्त झाला.

महाराष्ट्र हा भारतातल्या राजकीय आणि सामाजिक नकाशावर फार पूर्वीपासून आहे. तो एक वेगळा भाषिक गट म्हणून अस्तित्वात होता. सात वाहनांच्या पाली भाषेतील ग्रंथात 'महारठ्ठ' असा महाराष्ट्रीक प्राकृतिक शब्द आढळला आहे. त्या काळी एक भाषिक गट अस्तित्वात होता तो महाराष्ट्रीक. महाराष्ट्र हा बुद्धिवाद्यांचा देश, डोळसपणे वावरणारे, जाणते असे राज्य. महान लढवय्यांसाठी हे राज्य प्रसिद्ध आहे. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्र धर्म व सहिष्णू धर्म वाढावा म्हणून अनेक प्रयत्न केले. आपल्या राज्यात त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ते फक्त लढाई करणे, एवढेच जाणत नव्हते तर ते एक कल्याणकारी राज्यकर्तेही होते. गनिमीकावा या युद्धपद्धतीने त्यांनी महाराष्ट्राची अस्मिता सुरक्षित ठेवली. अहिल्याबाई होळकर यांची तर स्त्री सैनिक पथकेच होती.

महाराष्ट्रातील मराठी भाषेतील साहित्याचे ऐश्वर्य हे संत तुकाराम महाराजांच्या काळापासून वाढलेले दिसते. त्यांना तर विद्याअध्ययनाचा अधिकारही नव्हता. पण तरीही वाचन, श्रवण, मनन अशा स्वयंनिर्मित विद्येने त्यांनी सर्व समाजातील लोकांना एकत्रित आणले. त्यानंतर अनेक कवी अणि लेखक होऊन गेले. त्यांनी मराठी भाषा, साहित्याला एका वेगळ्या प्रगतीच्या मार्गावर नेऊन ठेवले आहे. कवी ना. धों. महानोर, गोविंदाग्रज यासारख्या कवी आणि लेखकांमुळे महाराष्ट्रातील या मराठी भोषेचे वेगळेच अस्तित्व निर्माण झाले आहे. त्याचा अभिमान करावासा वाटतो.

पण आता या माझ्या महाराष्ट्राला दृष्ट लागली की काय असे वाटते. महात्मा फुलेंच्या या माझ्या महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. इथे गाडगेमहाराजांची असताना त्याच माझ्या महाराष्ट्रात दाभोळकर, पानसरे यांच्या खुन्यांचा तपासही लागलेला नाही. सावित्रीच्या या महाराष्ट्रात खैरलांजीसारखे प्रकरण घडते आहे आणि म्हणूनच म्हणते

''जागा हो महाराष्ट्र,' जिथे लेकी सुना पाणवठ्यांवरून सुरक्षितपणे आपल्या घागरी घेऊन घरी पोचू''

''जागा हो महाराष्ट्र, जगभरच्या सगळ्या विद्यापीठात इथले विद्यार्थी नाम कमवो.''

''दुरितांचे तिमिर जावो।
जो वांच्छिल तो ते लाभो महाराष्ट्रीक।।

***

# कायदा आणि समाजिक उत्क्रांती



कु. शिवानी वकील
एलएल.बी. २

'मॅन इज अ सोशल ॲनिमल' असे एक इंग्रजी वचन आहे. म्हणजेच माणूस हा समाजामध्ये राहणारा प्राणी आहे. माणसाच्या याच उपजत नैसर्गिक प्रवृत्तीतून समाजाची रचना झाली. अनेक प्रकारच्या मानसिक, बौद्धिक, वैचारिक, आर्थिक अशा भिन्न स्तरातील व वर्गातील माणसे या समाजाचा घटक बनली. त्यातील चतुर व हुशार माणसे मानवी समूहाचे नेतृत्व करू लागली. पुढे वंशपरंपरेने या बलाढ्य माणसांची राज्ये वसली. या राज्याच्या कारभारासाठी आणि लोकांना बरे–वाईट, नैतिक–अनैतिक अशा गोष्टींचे भान देण्यासाठी काहीतरी नियमांची चौकट असणे गरजेचे बनले व यातूनच 'कायदा' या संकल्पनेचा उदय झाला.

आपण नेहमी वाचतो, ऐकतो की माणसासाठी कायदा की कायद्यासाठी माणूस? याबाबत मतमतांतरे असतील. पण एक गोष्ट नक्की, ती म्हणजे समाज व कायदा या हातात हात घालून चालणाऱ्या गोष्टी आहेत, या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**इतिहास :**

प्राचीन काळी ज्यावेळी राज्ये अस्तित्वात होती, त्यावेळी त्या त्या राज्याची आपली अशी स्वतंत्र न्यायव्यवस्था होती व कायदेविषयक नियमांची चौकटही होती. अगदी त्याही आदीच्या काळात– उदाहरणार्थ– वेदकाळात कायदा व त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा यासंदर्भातील उल्लेख आपल्याला त्या काळातील ग्रंथात आढळतात. मनू, कौटिल्य, चाणक्य, याज्ञवल्क्य अशा थोर विद्वान तपस्वींचे या संदर्भातील लेखन अजरामर आहे.

पूर्वीच्या काळी राजा ही ईश्वराचा दूत अथवा प्रतिनिधी अशी संकल्पना असल्यामुळे 'राजा बोले दल हाले' या म्हणीप्रमाणे सर्व व्यवस्था चालत असे. त्याकाळी कायदा होता, न्यायदानही होते. परंतू त्यामध्ये अनेक त्रुटी व उणीवा होत्या. कोणत्या गुन्ह्यासाठी काय शिक्षा याचे स्वरूप निश्चित नव्हते. तसेच दगडांनी ठेचून मारणे, शिरच्छेद करणे, हत्तीच्या पायाखाली देणे अशासारखे अमानुष शिक्षेचे प्रकार असत. गुन्ह्याचे स्वरूप व शिक्षा यांचे प्रमाण सम असेल याची खात्री नव्हती.

परंतू काळाच्या ओघात माणूस प्रगत होत गेला. त्यामध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रांत क्रांती झाली. त्याबरोबरच सामाजिक शास्त्रांचा उदय झाला आणि मानवी जीवनातील अनेक पैलूंकडे नव्या व उदार दृष्टीकोनातून पहिले जाऊ लागले. जसजसा अभ्यासाच्या विविध शाखांचा विकास होत गेला तसा या विषयाला निराळाच आयाम लाभला. यासंदर्भात पाश्चात्य देशांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**लोकशाहीचा उदय :**

त्यापुढील काळात लोकशाहीसारखी संकल्पना रूजली. अनेक देशांमध्ये ती अंमलातही आली आणि कायद्याला त्या त्या देशाची विशिष्ट चौकट लाभली, तिलाच आपण 'राज्यघटना' असे म्हणतो.

समाजातील सर्व घटकांचा विचार करणारी 'वी द पीपल' या आत्मीय शब्दांनी सर्व देशवासियांना एकत्र जोडून ठेवतानाच त्यांना त्याची कर्तव्ये व जबाबदारी यांचे भान देणारी भारताची राज्यघटना जगातील सर्वात मोठ्या राज्यघटनांपैकी एक आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेली ही घटना वाचली की तिचे सामाजिक मोठेपण लक्षात येते. भारतासारख्या अनेकविध संस्कृती नांदणाऱ्या, विविधतेने नटलेल्या, भाषा, पेहराव, चालीरिती याबाबतीत प्रचंड विविधता असलेल्या आणि सर्वात महत्त्वाचं, जिथे जातीव्यवस्थेची उतरंड आहे, अशा

देशात समाजाच्या सर्व स्तरांतील सर्व घटकांना या राज्य घटनेने एका सूत्रात बांधणे हे किती मोठे शिवधनुष्य पेलण्यासारखे आहे, हे लक्षात येते.

**स्वातंत्र्योत्तर काळ :**

ब्रिटीशांच्या राजवटीतून मुक्त होऊन आपण स्वतंत्र प्रजासत्ताक देश बनलो. आपली स्वतंत्र घटना अस्तित्वात आली आणि घटनेनुसार– Legislative, Executive आणि Judiciary या तीन पातळ्यांवर देशाच्या कारभाराची यंत्रणा कार्यान्वित झाली. आज आपल्या स्वातंत्र्याची सत्तरी पार होत आली आहे. अशावेळी समाज आणि कायदा या मुद्याचा विचार करता काही मूलभूत प्रश्न मनात उभे राहतात–

– स्वातंत्र्याचे महत्त्व आपण खरोखरच ओळखले आहे का?

– स्वातंत्र्याची फळे चाखताना त्या जोडीने येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे भान आपल्याला आहे का?

– आपल्याला भारताच्या संविधानाचे, कायद्याचे भान आहे का?

– स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असा सोयीस्कर अर्थ तर आपण घेत नाही ना?

– भ्रष्टाचाराने पोखरलेल्या यंत्रणेमुळे कायदा फक्त कागदावरच उरतो– असे आहे का?



समाजासाठी कायदा आणि कायद्याचा मान राखून आचरण समाज ही खरे तर किती साधी सोपी संकल्पना आहे. पण कायद्यातील तरतुदींचा गैरवापर होतो, त्यातून पळवाटा काढल्या जातात. सत्ता व पैसा यांच्या बळावर कायद्याची चौकट सहज मोडता येते, असा समज करून घेणे या गोष्टी समाजाच्या दृष्टीने व पर्यायाने देशाच्या दृष्टीने विनाशाला निमंत्रण देणारे आहेत.

काही ठिकाणी जातपंचायतींमध्ये तर्कहीन न्यायनिवाड्याच्या बातम्या आपण वाचतो. झथऊत्तअ (Protection of women Against Domestic Violence Act, २००५) कायद्याचा दुरूपयोग झालेला वाचतो तेव्हा समाज व कायदा या दोन्ही घटकांमधील समन्वय किती महत्वाचा आहे, ते लक्षात येते.

काळासोबत समाज बदलला. अनेक शाखांत खूप प्रगती झाली. माहिती तंत्रज्ञानाचा उदय झाला. त्याच दरम्यान श्रीमंत–गरीब ही विषमतेची दरीही वाढली. नैतिक मूल्यांचा ऱ्हास होऊ लागला. एकत्र कुटुंब व्यवस्था लोप पावू लागली. एकीकडे प्रगतीचे चित्र दिसत असतानाच, Everything comes with a price म्हणतात तसे त्यांचे भीषण रूपही समोर येऊ लागले. सायबर क्राईम हे त्याचेच एक उदाहरण होय. संपर्काचे प्रभावी माध्यम बनलेला मोबाईल जगभरातील कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देणारा संगणक वा इंटरनेट म्हटलं तर जग जवळ आणतात. पण जेव्हा त्याचा विघातक वापर होतो तेव्हा कायदा व

सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न उभा राहतो. पॅरिसवर नुकताच झालेला दहशतवादी हल्ला हे याचेच उदाहरण आहे. अगदी आपल्या अवतीभोवती पाहिलं तरी सुशिक्षित, सधन घरातील मुले ड्रग्जसारख्या व्यसनांच्या विळख्यात अडकतात. 'ईझी मनी'च्या पायी तरूण चोरीचा मार्ग अवलंबतात, मुली वाईट मार्गाला लागतात आणि 'व्हाईट कॉलर' गुन्हेगारी तर सर्रास आढळते. एखादे काम करून घेण्यासाठी चिरीमिरी लाच देण्यात आपल्यालाही काही गैर वाटत नाही. वाहतुकीचे नियम मोडण्यात अनेकांना तर जणू भूषण वाटते. अशावेळी मनात येते की कायदा सर्वांसाठी आहे, तो सर्वांसाठी सारखाच आहे. त्यामध्ये काळानुरूप विचारपूर्वक बदलही केले जात आहेत व तो वर्तमानाला अनुरूप बनवला जात आहे. परंतू समाजातील घटकच त्याचा योग्य तो मान ठेवणार नसतील आणि संबंधित यंत्रणा त्याच्या कठोर अंमलबजावणीसाठी उपाययोजना करणार नसतील तर त्याचा काय उपयोग आहे?

नव्याने विकसित झालेल्या Victimology या Criminology च्या शाखेचा मुख्य उद्देश आहे. गुन्ह्याची शिकार ठरलेल्या बळीचा सर्वार्थाने विचार एखाद्या गुन्ह्याबाबत न्यायनिवाडा करताना मुख्य भर गुन्हेगाराला शिक्षा देण्यावर दिला जातो. काही केसेसमध्ये गुन्हेगाराच्या पुनर्वसनाच्या दृष्टीनेही प्रयत्न केले जातात. पण बळी ठरलेली व्यक्ती मात्र दुर्लक्षित व उपेक्षित राहते. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयानं बिहारमधील एका ॲसिड हल्ला प्रकरणात अतिशय महत्वपूर्ण निकाल दिला आहे. न्यायालयाने या प्रकरणातील पीडित मुलीला उपचारांसाठी ठोस रक्कम देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच तिच्यावरील उपचारांबाबत राज्य सरकारला ठोस निर्देश दिले आहेत. अशाप्रकारे मानवतावादी दृष्टीकोन ठेऊन कायद्याची अंमलबजावणी केल्याची अनेक उदाहरणे देता येतील पण यामध्ये समाजाची भूमिका काय, हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. त्या मुलीला पुन्हा पूर्ववत होण्यासाठी समाज तिला मानसिक बळ देणार आहे– का उलट तिला हेटाळणीला सामोरे जावे लागणार आहे? आरोपीबाबत समाजाची काय भूमिका असणार आहे? त्याला व असे हिडीस कृत्य करू पाहणाऱ्या नराधमांना समाज काय संदेश देणार आहे– हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे.

कायदे अनेक पैलूंचा सांगोपांग विचार करून बनवलेले असतात. काळासोबत त्यात दुरूस्त्याही होत असतात. कायद्याच्या चौकटीचा प्रभाव व धाक जबरदस्त असतो. पण त्याची अंमलबजावणी आणि एकूणच याबाबतीत समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे समाज व कायदा या गोष्टींचा वेगळा विचार करताच येणार नाही. तो परस्पर संदर्भातच करावा लागेल.

अखेर कायदा हा लोकांसाठीच आहे. त्यांना कायद्यातील तरतुदी समजतील अशा भाषेत सांगणं, कायद्यातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करणं, भ्रष्टाचाराची विषवल्ली मुळापासून उपटून टाकणं, बालपणापासूनच घरीदारी सर्वत्र नैतिक मूल्यांची जोपासना करणं इत्यादी मार्गांद्वारे कायदा व समाज यांच्यामध्ये सुसंगती व समन्वय राखता येणे शक्य होईल. त्यासाठी गरज आहे ती इच्छाशक्तीची. समाजाच्या बरोबरीने सर्व यंत्रणांनी आपले कर्तव्य नैतिकतेने व निष्ठेने पार पाडले तर तारीख पे तारीखच्या चक्रात अडकलेल्या सामान्य माणसावर 'शहाण्या माणसाने कधी कोर्टाची पायरी चढू नये,' असे म्हणण्याची वेळ येणार नाही आणि कायदा हे कुणाच्या हाताचं बाहुलं न बनता– कानून के हाथ बहुत लंबे होते हैं। या फिल्मी वाक्याची प्रचिती समाजाला नक्कीच येईल आणि 'कायदा' या संकल्पनेचा धाक व जरब निर्माण होऊन सुस्थित समाजाची निर्मिती होईल, यात शंकाच नाही.

***

# विद्यार्थी नापास का होतात?

वर्षाचे एकूण दिवस ३६५
३५ दिवस दिवाळी आणि नाताळची सुट्टी
उरले दिवस ३३०
५० दिवस उन्हाळ्याच्या सुट्टीत जातात
उरले २८० दिवस
एका वर्षात एकूण ५२ रविवार असतात
उरले २२८ दिवस
विद्यार्थी आठ तास झोपतो म्हणजे
वर्षातून आठ तास झोपतो म्हणजे
वर्षातून २१२ दिवस झोपतो
उरले १०३ दिवस
कपडे बदलणे, अंघोळ करणे, जेवण यामध्ये
दररोज अडीच तास जातात
म्हणजे ३८ दिवस
उरले ६८ दिवस
खेळासाठी दररोज १ तास म्हणजे
१५ दिवस
उरले ५३ दिवस
आजारपण, यात्रा, कार्यक्रम यासाठी १० दिवस
उरले ४३ दिवस
सणासाठी वर्षातून १५ दिवस सुट्टी
उरले २८ दिवस
द. त. पाहणे यासाठी
किमान १ तास
म्हणजे १५ दिवस
उरले १३ दिवस
परीक्षा १२ दिवसांची उरला १ दिवस
आणि तोही दिवस निकाल पाहण्यात जातो
मग तुम्हीच सांगा
विद्यार्थी नापास होणार का पास?

**- सौ. अर्पणा सु. माने**
एलएल.बी. १

# असे का होते?

असे का होते?
जो हृदयाच्या सर्वात जवळ असतो
तोच आपल्यापासून नेहमी दूर जातो
ज्याच्याकडून आशा ठेवतो
त्याच्याकडूनच निराशा मिळते
असे का होते?
ज्याच्यासोबत सुखाचा विचार करतो
तोच आपल्या दु:खाचे कारण बनतो
ज्याची स्वप्ने पाहतो
तोच त्यांना तोडतो
असे का होते?
ज्याच्यावर जीवापाड विश्वास असतो
तोच सर्वात मोठा धोका देतो
जो वारंवार मन तोडतो
आपले मन त्याच्याच मागे धावते
असे का होते?
ज्याच्याशिवाय एक मिनिटही करमत नाही
त्याच्याकडे फक्त आपल्यासाठीच वेळ नाही
ज्याची आतुरतेने डोळे वाट पाहतात
त्याच डोळ्यांमध्ये ते अश्रु देवूनी जातात
असे का होते?

**- कु. माधूरी भू. बंडगर**
एलएल.बी. १

***

## मैत्री

लांबचा पल्ला गाठताना
दूर दूर जाताना......
दुःख सारी खोडायला
नवे नाते जोडायला.........
ठेच लावता सावरायला
चुकीच्या वाटेवर आवरायला.....
मी असेल तुझ्याबरोबर नेहमीच
तुझ्या प्रश्नांची कोडी सोडवायला......

**- कु. पूनम र. पाटील**
एलएल.बी. १

***

## आधुनिक म्हणी

* म्हैसळीचे खाणार त्याला सरकार देणार
* पगार टिचभर बजेट हातभर
* अडला विद्यार्थी गाइडचे पाय धरी
* एकमेका कॉपी देऊ अवघे होऊ उत्तीर्ण
* पगार येई घरा तोचि दिवाळी दसरा
* साखरेच खाणार त्याला मधुमेह होणार
* तोंडात नाही दात बसला फुटाणे खात
* प्रेमात पडला त्याचा हुंडा बुडाला

**- सौ. अर्पणा सु. माने**
एलएल.बी. १

***

## शहाजी लॉ कॉलेज के लिए....

प्यार है आशिक के लिए।
फूल है खुशबु के लिए।
सुरज है तेज के लिए।
चाँद है चाँदनी के लिए।
रंग है सुंदरता के लिए।
कॉलेज है हमारे लिए।
हम है कॉलेज के लिए।
और यह कविता है।
शहाजी लॉ कॉलेज के लिए।


**- सौ. अर्पणा सु. माने**
एलएल.बी. १

***





**Kum. Nitin kamble**
**III NLC**



**Dr. A.P.J. Abdul Kalam**



CamScanner

# GYMKHANA REPORT 2015-2016

By Prof. U.T.Powar Gymkhana Chairman

**14th August 2015 :** On account of Independence Day, Premises cleanliness programme was arranged. Dr. Himatsingh Shinde inaugurated the programme.

**69th Independence Day 15th August 2015 :** On the eve of 69th Independence Day flag was hoisted at the hands of Hon'ble Mrs. Rajnitai Magdum, President Council of Education, Kolhapur.

**5th Sept. 2015 :** Teacher's Day was celebrated by the students in the college.

**11th Sept. 2015 :** One Day workshop on' The Sexual Harassment of Women at workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act 2013' under lead college scheme. Hon'ble Shri. S.G.Vedpathak Additional Sessions Judge and District Judge - 1 was the chief guest of the function Hon'ble Adv. Shri V.N.Patil, member Council of Education Kolhapur was the President of the function. Prin. Dr. R.Narayan in his introductory speech explained the purpose of the workshop. In the first technical session, Adv. Dr. Santosh Shah explained the Act and provisions relating to sexual harassment at workplace. Hon'ble Shri. L.D.Bile Additional Session Judge and District Judge - 3 explained the methods for implementation of the Act. Prin. Dr. R.Narayan was the chairperson for the second session. Prof. Dr. Mrs.S.R.Rasam, coordinator organised the programme.

**15th Sept 2015 : 106th Birth Anniversary of late Dr. Ratnappa Kumbhar :** Birth anniversary of Late Dr. Ratnappa Kumbhar, founder Council of Education, Kolhapur was celebrated in the college. Hon'ble Mrs. Rajnitai Magdum, President Council of Education , Kolhapur. Prin.L.M.Gaud, Member Council of Education Adv. Shri. V. N. Patil, member Council of Education Prin. Tupe, Night college of Arts and Commerce Kop. Prin. Dr. Narayan, members of teaching, non-teaching staff and the students were present.

**10th Oct. 2015 :** One Day workshop on ' Protection of Children from Sexual offences Act 2012' under lead college scheme was organized in the college.

Hon'ble Shri. S. G. Vedpathak Additional Sessions Judge and District judge - 1 Kolhapur.was the chief guest of the function. Hon'ble Adv. Shri. V. N. Patil, member Council of Education presided over the function. Prin. Dr. J. B. Pishte Principal G.K.G. College Kolhapur and Chairman Gopal Krishna Gokhale college cluster scheme was also the guest of the function. Prin. Dr. R.Narayan in his introductory speech explained the object and purpose of the function. In the first technical session Adv. Swapnil Chile was the resource person. He spoke on the protection of children from sexual offences Mrs. Arti M. Naniwadekar, Law officer, Bal Sankul Kolhapur was the other resource person. She explained the measures to be adopted in solving the cases of children. Prof U. T. Powar offered vote of thanks. Dr. Mrs. S. R. Rasam co-ordinator arranged he function.

**17th Oct. 2015 Guest Lecture**

Adv. Shri. Krishna Devan,Advocate Andhra Pradesh High court delivered lecture on professional ethics and Constitutional Law

**31st Oct. 2015 : Guest lecture on NSE :** Shri. Prasanna Deshingkar delivered the lecture on National Stock Exchange.

**25th Nov. 2015 : Following students of our college won prizes in the Magazine Competition held by Shivaji University, Kolhapur :**

Dr. Bhagyashree N. Kulkarni LL.B. II
Ashwini D. Patil - NLC V
Shivani A. Vakil LL.B. I
Sangram R. Patil - LL.B. II

**23rd Dec. 2015 - 17th Death Anniversary of late Dr. Ratnappa Kumbhar:** On 23rd Dec. 2015, 17th death anniversary of late Dr.Ratnappa Kumbhar was celebrated in the college. Hon'ble Mrs. Rajnitai Magdum, President Council of Education, Shri. Prasad Kamat, Vice President Council of Education, Prin. L. M. Gaud, Member, Council of Education, Prin., Dr. R. Narayan, members of teaching non-teaching staff and the **students were present.**

**26th Jan. 2016 :** On 67th Republic Day the flag was hoisted by Prin. L. M. Gaud, Member, Council of Education, Kolhapur. Prin. Dr. R. Narayan, members of teaching, non-teaching staff and students were present.

**30th Jan. 2016:** Inter Class Moot Court Competition was held in the college. Adv. Shri Shivajirao Rane, former President Kolhapur District Bar Association was the chief guest of the function.

Result of competition:
I : Juber S. Makandar III NLC
II: Aviraj Bhaskar III NLC
III: Abhishek B. Devkar V NLC
Mousmi Mulchandwani IV NLC
Consolation: Udayraj Hilal IV NLC
Siddhi J. Gandhi III NLC.

**Jan. 2016 College Essay Competition**

Essay competition was held in the college.
Result:
I : Bhagyashree N. Kulkarni III LL.B.
II Shrutika V. Jadhav II LL.B.
III Shiwani A. Vakil II LL.B.

**12th Feb. 2016 :** One Day Workshop on 'Role of Consumer in Medical Services' under Lead college scheme. Hon'ble Shri. Sharad D. Madake, President, District Consumer Redressal Forum Kolhapur was the chief guest of the function. Adv. Shri. V.N.Patil. Member, Council of Education, Kolhapur presided over the function. Prin. Dr. R.Narayan in his introductory speech explained the object of the function. In the first technical session Adv. Dr. Santosh Shah discussed the legal provisions relating to medical negligence. In the second technical session Dr. P. M. Chougule and Dr. Vishwanath Magdum explained the relation between medical service and consumer law. Prin. Dr. R. Narayan was the Chairperson of both the sessions. Prof. Dr. S.R.Rasam co-ordinator, arranged the function.

**16th Feb. 2016 Legal Awarness Programme:** In association with Kolhapur District Legal Services Authority, Legal awareness programme was organised in the college. Hon'ble Shri Ajay V. Gujarati, Secretary District Legal Services Authority was the chief guest of the function. Hon'ble Mrs. Ujwala Musale, Principal Magistrate of Juvenile Justice Board, Kolhapur, and Shri Ravikaran V. Sapate JMFC, Kolhapur, spoke on the occasion. Prin. Dr. R. Narayan presided over the function. Prof. U. T. Powar offered vote of thanks.

**29th Feb.2016 Annual Sports:** Annual



CamScanner

sports were conducted on 29th Feb and 1st March 2016. Prof. Dr. Sharad Bansode, physical Director D.R.K. College of Commerce, Kolhapur conducted the sports in peaceful manner.

**11th March, 2016:** On account of 125th Birth Anniversary of Dr. Babasaheb Ambedkar Lecture Series, in association with Shivaji University a programme was arranged in the college. Prof. Shri. Vivek.Y.Dhupdate, I/C HoD Dept.of Law Shivaji University was the chief guest of the function Prin. Dr. R. Narayan Presided over the function.

**2nd March 2016 Free Legal Aid and Advice Camp:** Free legal aid and advice camp was organised at Minache Tal. Hatkanangle Dist. Kolhapur. Prin. Dr. Narayan,Prof. Dr. Mrs. S.R.Rasam, Prof. Dr.M.C.Sheikh spoke on the occasion.

**Achievements of Students**

Miss. Satam Tanvi S. was selected for West zone Inter University TableTennis (w) Tournament 2015-16.

Miss. Kalyani Salokhe III NLC stood II in National Level competition, held by Gandhi Vichar Sanskar Research Foundation Jalgaon on 11/10/15.

Karan Jadhav I Pre law and Ranveer Jadhav IV NLC were selected in Shivaji University Badminton team to represent University at west zone. They stood III in west zone Inter University Champion and qualified for all India Inter University Championship held from 15 to 19 Oct. 2015 at Gwalior.

Shahaji Law College stood I in Inter University badminton Championship 2015-16.

**22nd March 2016, 83rd Annual Prize Distribution Function:**

83 rd Annual Prize Distribution function was held on 22nd March 2016. Hon'ble Shri. Rajendra G. Avachat Principal District and Sessions Judge, Kolhapur was the chief guest of the function. Adv. Shri V.N.Patil, Member Council of Education, Kolhapur presided over the function. Hon'ble Shri L.D.Bile, Additional District and Session Judge, Kolhapur was also the guest of the function. Prin. Dr. R. Narayan narrated the history and development of the College and Institution. Prof. U. T. Powar placed the annual report of the events conducted in the college during the academic year. Shri. Ravi Redekar President, Students Bar Association, Shahaji Law College offered the vote of thanks Prin. Shri L. M. Goud, Member Council of Education, Prin. Dr. S. B. Patil , D. R. K. College of Commerce were also present.

***

# Merit List for the year 2015 - 2016
## (Academic Year 2014-2015)

| Sr. No | Name of the Student | Class | Rank |
|---|---|---|---|
| 1 | Vakil Shivani A. | I LL.B. | College Prize Standing I |
| 2 | Badi Rameshwary R. | I LL.B. | College Prize Standing II |
| 3 | Chitnis Siddhi P. | I LL.B. | College Prize Standing III |
| 4 | Bagal Rajlaxumi | II LL.B. | College Prize Standing I |
| 5 | Patil Dipti M. | III LL.B. | College Prize Standing I |
| 6 | Sheikh Tanvi R. | I Pre Law | College Prize Standing I |
| 7 | Mulla Fatima R. | I Pre Law | College Prize Standing II |
| 8 | Mistry Bhavini A. | I Pre Law | College Prize Standing III |
| 9 | Bhaskar Aviraj D. | II Pre Law | College Prize Standing I |
| 10 | Bindage Arati S. | II Pre Law | College Prize Standing II |
| 11 | Gaikwad Shivprasad L. | II Pre Law | College Prize Standing III |
| 12 | Raktade Aditya S. | III NLC | College Prize Standing I |
| 13 | Karekar Laxmi C. | III NLC | College Prize Standing II |
| 14 | Khandekar Kalyani R | III NLC | College Prize Standing II |
| 15 | Salavi Smital A. | IV NLC | College Prize Standing I |
| 16 | Zambare Sayali S. | IV NLC | College Prize Standing II |
| 17 | Kulkarni Archana A. | IV NLC | College Prize Standing III |
| 18 | Choudhari Pranoti S. | D.I.T. | College Prize Standing I |



CamScanner

# Donor Prize List for the year 2015 - 2016 (Academic Year 2014-2015)

| Sr. No. | Name of the Student | | Name of the Donor | Class / Subject |
|---|---|---|---|---|
| 1 | Miss. Patil Dipti Madan | 1 | Late Barister Shamrao Kelavakar Memorial | III LL.B |
| | | 2 | Late Waman Dattatray Adake Prize | III LL.B |
| | | 3 | Late Shri Govind Raghunath Walivdekar Prize | III LL.B |
| | | 4 | Late Shri Rajaram Bapu Patil Prize | III LL.B |
| | | 5 | Late Shri Jaganath Reghunath Kelkar Prize | III LL.B |
| | | 6 | Late Shri R.M.Apate Prize | III LL.B |
| | | 7 | Late Shri Pandurang Atmaram Lanjekar Prize | III LL.B |
| | | 8 | College Prize Standing I | III LL.B |
| 2 | | 1 | Late B.G.Alias Bapusaheb Karmarkar Prize | III LL.B. (Cr.P.C.) |
| 3 | Miss. Chitnis Siddhi P. | 1 | Late Dattatray Raghunath Dixit Prize | I LL.B. (Family Law) |
| | | 2 | Late Shri S.R.Potnis Prize | I LL.B. (Family Law) |
| | | 3 | Late Shri Kakasaheb Aliance D.N.Sarlashkar Prize | I LL.B. (Family Law) |
| | | 4 | Shri S.B.Patil Prize | I LL.B. (Family Law) |
| | | 5 | College Prize Standing III | I LL.B. |
| 4 | Miss. Bagal Rajlaxmi D. | 1 | Shri Basawantrao Ganpatrao Prize | II LL.B (Jurisprudence) |
| | | 2 | Late Shri Prin.S.G.Dabholkar Prize | II LL.B. (Jurisprudence) |
| | | 3 | G.N.Gabale Prize | II LL.B. (Property Law) |
| | | 4 | Shri. K. B. Kelkar | II LL.B. (Pub.Int. Law) |
| | | 4 | College Prize Standing I | II LL.B. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | Miss. Badi Rameshwari R. | 1 | Late Shri Prin.S.G.Dabhokar Prize | I LL.B.(Constitution) |
| | | 2 | Shri S.B.Patil Prize | I LL.B. |
| | | 3 | College Prize Standing II | I LL.B. |
| | | | | |
| 6 | Miss. Magdum Poonam A. | 1 | Late Shri Prin.S.G.Dabhokar Prize | I LL.B.(Contract) |
| | | 2 | Shri S.B.Patil Prize | I LL.B. |
| | | | | |
| 7 | | 1 | Adv. Shri Patil Deepak Ganpatrao Prize | V NLC |
| | | 2 | College Prize Standing I | V NLC |
| | | | | |
| 8 | Raktade Aditya S. | 1 | Adv. K.A.Kapase Prize | III NLC |
| | | 2 | College Prize Standing I | III NLC |
| | | | | |
| 9 | Kekare Tejaswini M. | 1 | Late Shri K.P.Khasbardar Prize | IV NLC (Family Law) |
| | | | | |
| 10 | Khandekar Kalyani R. | 1 | Late Shri K.P.Khasbardar Prize | IV NLC (Family Law) |
| | | 2 | College Prize Standing II | IV NLC |
| | | | | |

CamScanner

# LIST OF Full Time Teaching STAFF

| | | |
|---|---|---|
| 1 | Dr. Narayana C. Rayadurgam<br>M.A.,B.Ed.,LL.M.,NET.,M.H.R.,NET,Ph.D.(Law) | Principal |
| 2 | Shri. Udhav T. Powar<br>B.A.,LL.M. | Associate Professor |
| 3 | Mrs. Dr. Savita R. Rasam<br>M.A.,LL.M.,Ph.D. (Law) | Assistant Professor |
| 4 | Dr. Moula C. Sheikh<br>B.Sc., LL.M.,NET, ADR,DCL,Ph.D.(Law),MBA. | Assistant Professor |
| 5 | Shri. Pravin B. Patil<br>B.A., LL.M.,NET. | Assistant Professor |
| 6 | Shri. Suhas V. Patki<br>B. Com., LL.M.,NET. | Assistant Professor |
| 7 | Mrs. Asmita P. Patil<br>B.S.L., LL.M.,NET, SET | Assistant Professor |
| 8 | Shri. Shri. Desai<br>B.S.L., LL.M.,NET., M.S.W., G.D.C.& A. | Assistant Professor |
| 9 | Mrs. Suchita R. Suragihalli<br>M.A.,SET. Political Science (Pre-Law Course) | Assistant Professor |
| 10 | Shri. Kailas R. Pawar<br>M.A.,M.Lib. & Isc.,NET. | Librarian |

## VISITING FACULTY

| | | |
|---|---|---|
| 11. | Adv. Dr. R.G. Pandurkar | M.Sc., LL.M., Ph.D. |
| 12. | Adv. Dr. Santosh Shah | B.A., LL.M., Ph.D. |
| 13. | Adv. Sou. Neelam Gandhi | B.A., LL.M. |
| 14. | Adv. Swapnil Chile | B.S.L., LL.M., N.E.T. |
| 15. | Shri. R.G. Panhalkar | M.A., LL.M., M.Phil |



CamScanner

| | | |
|---|---|---|
| 16. | Sou. Pooja Gotkindkar | M.A., M.Phil |
| 17. | Shri. Todkar Ranjeet A. | M.A. |
| 18. | Dr. Prithviraj A. Raghuvanshi | M.A., Ph.D. |
| 19. | Miss. Shilpa G. Patil | M.Sc. |
| 20. | Sou. Shrinidhi H. Bhurke | M.Com. LL.M. |
| 21. | Sou. M. A. Thombare | M.A., LL.M. |
| 22. | Sou. Jyoti Shete | B.S.L., LL.M. |
| 23. | Sou. Tupe | M.A. |

## List of Administrative Staff

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Shri. Anil N. Ghatge. | B.Com, D.L.L. | Head Clerk |
| 2. | Shri. Suhas A. Samangadkar | B.Com | Senior Clerk |
| 3. | Shri. Kuldeep V. Makote | M.Com | Junior Clerk |
| 4. | Shri. Ananda S. Bore. | 12th Class | Library Attendant |
| 5. | Shri. Meharali B. Fakir. | 12 th Class | Library Attendant |
| 6. | Shri. Ananda S. Wagare. | B.A. -I | Library Attendant |
| 7. | Shri. Sunil S. Harale. | B.A. -I | Peon |
| 8. | Shri. Sanjay D. Kale. | 9 th Class | Peon |
| 9. | Shri. Rahul N. Pandat. | B.Com-I | Peon |



CamScanner

# Assets of the College



Miss. Rajlaxmi Bagal (LL.B.III) & Miss. Sayali Zambare (V NLC) won Best Memorial Prize & the Second Kashibai Navale Moot Court Competition, 2016 held at Sinhagad Law College, Pune.

Dr. Bhagyashree Kulkarni was felicitated by Sant Gadage Maharaj Centre for her priceless contribution to marathi literature at the hands of Dr. Devanand Shinde, Vice -Chancellor, Shivaji University, Kolhapur.





**School of Law, Christ University, Bengaluru**

***National Conference on***

***Affirmative Action and the Indian Constitution***

- Title:- "Alleviating Discrimination with Discrimination: The Placebo or Sine Qua Non?"
- Subtheme:- Jurisprudence of Affirmative Action.
- Name of the Authors : Mr. Sumer V. Daithankar (Author)
  Miss. Kalyani R. Khandekar (Co-Author)



Mr. Sumer Daithankar & Miss. Kalyani Khandekar Presented a paper in the National Seminar held in the School of Law, Christ University, Bengaluru .

## Assets of the College



The college Badminton Team which won the Inter University Badminton Championship 2015-16 with the Principal & Gymkhana Chairman.

The team Members are -

1. Ranveer Jadhav
2. Karan Jadhav
3. Ashwin Bhavsar
4. Harshwardhan Rane
5. Ashish Patil

### Karan A. Jadhav

* Represented Maharashtra Junior State Badminton team at National Level for three Consecutive years.
* won 'Excellent Performance' at Maharashtra Junior State Badminton Championship.
* Runner-up in State badminton Championship at Aurangabad 2016.





### Ranveer & Karan Jadhav

* Selected in Badminton team Shivaji University for West-Zone Inter-University Badminton Championship 2015-16.
* stood third in the West-Zone Inter-University Championship & qualified for All India Inter-University Badminton Championship 2015-16.

Shivraj Press / 9823321832

CamScanner